www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide

MH SET 2011 COMMERCE PAPER 2 NOVEMBER 27, 2011 QUESTION PAPER

NOV - 50211/II

Commerce
Paper II
वाणिज्य
प्रश्नपत्रिका II

Time Allowed : 75 Minutes] **[Maximum Marks : 100**

Note : This paper contains **Fifty (50)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

सूचना : या प्रश्नपत्रिकेत एकूण **पन्नास (50)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Any group that has an actual or potential interest in or impact on a company's ability to achieve its objective is called as ....
   (A) Society
   (B) Target group
   (C) Public
   (D) Competitor

2. An important fact about external macro-environmental forces is that they are ....
   (A) positive
   (B) negative
   (C) controllable
   (D) uncontrollable

1. ज्या समूहाची कंपनीच्या ध्येयप्राप्तीच्या क्षमतेवर प्रभाव गाजविण्याची क्षमता असते तसेच ज्याला कंपनीच्या उद्दीष्टप्राप्तीत सुप्त अथवा प्रत्यक्ष रुची असते त्याला .... असे म्हणतात.
   (A) समाज
   (B) लक्ष्यसमूह
   (C) जनता
   (D) स्पर्धक

2. समग्र बाह्य पर्यावरणाच्या घटकांसंबंधीची महत्त्वाची वस्तुस्थिती म्हणजे ते .... घटक असतात.
   (A) सकारात्मक
   (B) नकारात्मक
   (C) नियंत्रणक्षम
   (D) अनियंत्रित

[P.T.O.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

3. After independence under the leadership of Jawahar Lal Nehru, India adopted .... as its goal.

   (A) communism

   (B) democratic socialism

   (C) capitalism

   (D) philonthrophic capitalism

4. Deficit on .... implies that the residents of a country are spending more on imports of goods and services than the incomes they are earning from exports of goods and services.

   (A) Capital Account

   (B) Current Account

   (C) Budget

   (D) Capital inflows and outflows

3. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पं. जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली भारत शासनाने .... हे ध्येय म्हणून स्विकारले आहे.

   (A) साम्यवाद

   (B) लोकशाही समाजवाद

   (C) भांडवलवाद

   (D) भूतदयावादी भांडवलवाद

4. जेव्हा देशातील रहिवासी वस्तू व सेवांच्या निर्यातीतून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नापेक्षा विदेशी वस्तू व सेवांच्या आयातीवर अधिक खर्च करतात तेव्हा त्याला .... असे म्हणतात.

   (A) भांडवली लेख्यावरील तूट

   (B) महसूली लेख्यावरील तूट

   (C) अंदाजपत्रक

   (D) भांडवलाची आवक व जावक

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide

5. .... became essential from the point of view of promoting industrial growth by the creation of additional productive capacity and its optimal utilisation.

(A) Privatisation

(B) Industrialisation

(C) Industrial liberalisation

(D) Globalisation

6. The method of project evaluation that does *not* consider the full serviceable life of an asset is ....

(A) payback period method

(B) average rate of return method

(C) net present value method

(D) internal rate of return method

5. अधिक उत्पादनक्षमता आणि तिचा पर्याप्त वापर करून औद्योगिक विकासाचा दर वाढविणे ह्या दृष्टीकोनातून .... हे आवश्यक ठरते.

(A) खाजगीकरण

(B) औद्योगिकीकरण

(C) औद्योगिक उदारीकरण

(D) जागतिकीकरण

6. एखाद्या संपत्तीचे पूर्ण कार्यक्षम आयुष्य लक्षात न घेणाऱ्या प्रकल्प मूल्यमापन पद्धतीला .... असे म्हणतात.

(A) गुंतवणूक वसुल कालावधी (पेबॅक पिरीयड)

(B) सरासरी परतावा दर पद्धत (ॲव्हरेज रेट ऑफ रिटर्न)

(C) सद्यस्थित मूल्य पद्धत (नेट प्रेझेंट व्हॅल्यू मेथड)

(D) अंतर्गत परतावा दर पद्धत (इंटर्नल रेट ऑफ रिटर्न मेथड)

www.prepp.in

7. .... is an expired cost resulting from productive usage of asset.
   (A) Expense
   (B) Cost
   (C) Revenue expenditure
   (D) Capital expenditure

8. Location, person or an item of equipment for which cost may be ascertained and used for the purpose of control is ....
   (A) cost unit
   (B) cost centre
   (C) profit centre
   (D) cost object

9. The method that is applied where work is undertaken to customers special requirements is ....
   (A) unit costing
   (B) batch costing
   (C) job order costing
   (D) terminal costing

7. एखाद्या मालमतेच्या उत्पादनक्षम वापरामुळे त्याच्या परिव्ययाची समाप्ती होण्यास .... असे म्हणतात.
   (A) खर्च
   (B) परिव्यय
   (C) आवर्ती खर्च
   (D) भांडवली खर्च

8. नियंत्रणाच्या हेतूने एखादे स्थान, व्यक्ती, घटक अथवा उपकरण यांच्या परिव्ययाचे निर्धारण करणे म्हणजे .... होय.
   (A) परिव्यय एकक
   (B) परिव्यय केंद्र
   (C) लाभ केंद्र
   (D) परिव्यय उद्दीष्ट

9. ग्राहकांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन कार्य करण्यासाठी जी पद्धत वापरतात तिला .... असे म्हणतात.
   (A) घटक परिव्यय पद्धत
   (B) तुकडी परिव्यय पद्धत
   (C) कार्य आदेश परिव्यय पद्धत
   (D) अंतिम परिव्यय पद्धत

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

10. The costs which are ascertained after they have been occurred and are *not* available until after the completion of manufacturing operations are ....

(A) Controllable cost

(B) Predetermined cost

(C) Historical cost

(D) Relevant cost

11. A commodity is called a 'Giffen Goods' when ....

(A) the goods is low priced

(B) it is an inferior goods

(C) the goods does not have substitutes

(D) negative income effect on inferior goods is stronger than positive substitution effect

10. एखादी उत्पादक क्रिया पूर्ण होईपर्यंत जे परिव्यय उपलब्ध नसतात आणि ज्यांची निश्चिती करता येत नाही आणि ज्यांचे निर्धारण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच करता येते त्यांना .... असे म्हणतात.

(A) नियंत्रणयोग्य परिव्यय

(B) पूर्वनिर्धारित परिव्यय

(C) ऐतिहासिक परिव्यय

(D) संदर्भांकित परिव्यय

11. एखाद्या वस्तुला 'गिफन वस्तू' असे खालील परिस्थितीत म्हणतात ....

(A) वस्तूची किंमत कमी असते

(B) वस्तू निम्न दर्जाची असते

(C) ठराविक वस्तूला पर्यायी वस्तू उपलब्ध नसते

(D) या वस्तूच्या मूल्यावर होणारा नकारात्मक उत्पन्न प्रभाव तिच्या सकारात्मक पर्यायी प्रभावापेक्षा अधिक परिणामकारक असतो

www.prepp.in

12. Two commodities are considered to be perfect substitutes for each other if the elasticity of substitution is ....

(A) positive

(B) negative

(C) zero

(D) infinite

13. If nothing is produced, the loss will be equal to ....

(A) variable cost

(B) total cost

(C) average cost

(D) fixed cost

14. .... that works as a basic criteria of decision by privately owned and controlled firms.

(A) Profit maximisation

(B) Wealth maximisation

(C) Return on investment

(D) Return on capital employed

12. जेव्हा पर्यायाची लवचिकता .... असते तेव्हा दोन वस्तू एकमेकांना अचूक पर्याय आहेत असे मानले जाते.

(A) सकारात्मक

(B) नकारात्मक

(C) शून्य

(D) अनंत

13. जेव्हा काहीच निर्माण केले जात नाही तेव्हा हानी (तोटा) .... च्या बरोबर असते.

(A) चल परिव्यय

(B) सकल परिव्यय

(C) सरासरी परिव्यय

(D) स्थिर परिव्यय

14. खाजगीरित्या नियंत्रित व स्वामित्व असणाऱ्या संस्थांचा निर्णय घेण्याचा मुख्य आधार .... हा आहे.

(A) लाभ महत्तीकरण

(B) संपत्ती महत्तीकरण

(C) गुंतवणूकीवरील परतावा

(D) गुंतविलेल्या भांडवलावरील परतावा

www.prepp.in

15. The objective of .... is *not* to recover cost but to realise the value of the product persued by the customers.

(A) tender pricing

(B) value pricing

(C) differentiated pricing

(D) psychological pricing

16. Arithmetic mean of 5 items is 20. The smallest item is 10 and the largest item is greater than smallest by 14. If the largest and smallest items are ignored, the arithmetic mean of new items will be ....

(A) 22

(B) 24

(C) 22.5

(D) 23.5

15. .... या मूल्यधोरणाचे उद्दीष्ट हे परिव्ययाचे वसुली करणे नसून ग्राहकांना प्राप्त होणाऱ्या मुल्यानुसार किंमत ठरविणे हे आहे.

(A) निविदा किंमत

(B) मूल्याधिष्ठीत किंमत

(C) विभेदात्मक किंमत

(D) मानसशास्त्रीय किंमत

16. 5 घटकांचा अंकगणितीय माध्य 20 आहे. सर्वात लहान घटक 10 आहे आणि सर्वात मोठा घटक 14 आहे. जर सर्वात लहान आणि सर्वात मोठा घटक दुर्लक्षित केले तर नविन अंकगणितीय माध्य .... असेल.

(A) 22

(B) 24

(C) 22.5

(D) 23.5

www.prepp.in

17. Mrs. X gave birth to 5 children in alternate years. Then the standard deviation of the ages in years of these children will be ....

(A) 4

(B) 10

(C) $\sqrt{8}$

(D) $\sqrt{10}$

18. The statistical test used for testing the null hypothesis of equality of two population variances is ....

(A) Chi-square test

(B) *t*-test

(C) Z-test

(D) F-test

19. If the correlation coefficient between two variables is +1 or –1 then the regression lines are ....

(A) parallel

(B) at 0 degree

(C) perpendicular to each other

(D) do not exist

17. सौ. एक्स यांनी 5 मुलांना एका आड एक वर्षी जन्म दिला तर या मुलांच्या वयांचे प्रमाण विचलन .... असेल.

(A) 4

(B) 10

(C) $\sqrt{8}$

(D) $\sqrt{10}$

18. दोन समग्रांच्या समान विचलनाचे गृहीतक तपासण्यासाठी .... ही संख्याशास्त्रीय चाचणी वापरतात.

(A) काय-स्क्वेअर टेस्ट (Chi-square test)

(B) टी-टेस्ट

(C) झेड-टेस्ट

(D) एफ-टेस्ट

19. जर दोन चलांमधील सहसंबंध सहगुणक +1 किंवा –1 तर दोन समाश्रमण रेषा ....

(A) समांतर असतील

(B) शून्य अंशावर असतील

(C) काटकोनात असतील

(D) आस्तित्वात नसतील

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide

20. In time series analysis, the method which *cannot* be used for forecasting is ....

(A) Graphical method

(B) Fitting of straight line trend

(C) Moving averages method

(D) Fitting of second degree parabola

21. Planning, organizing, command, coordination and control as managerial functions were given by ....

(A) Frederic Taylor

(B) Henry Fayol

(C) W. French

(D) E. Mayo

22. Motivation is basically a ....

(A) sociological process

(B) physiological process

(C) psychological process

(D) intellectual process

20. कालमालेच्या विश्लेषणामध्ये .... या पद्धतीचा उपयोग अनुमान काढण्यासाठी होत **नाही**.

(A) आलेखीय

(B) सरळरेषा प्रवृत्ती ठरविणे

(C) हलती सरासरी

(D) द्वितीय श्रेणी वक्र ठरविणे

21. नियोजन, संघटन, आदेश, समन्वय आणि नियंत्रण या व्यवस्थापकीय कार्यांची संकल्पना .... यांनी दिली.

(A) फ्रेड्रिक टेलर

(B) हेन्री फेयॉल

(C) डब्ल्यू. फ्रेंच

(D) इ. मायो

22. अभिप्रेरण ही मूलतः .... आहे.

(A) समाजशास्त्रीय प्रक्रीया

(B) शरीरशास्त्रीय प्रक्रीया

(C) मानसशास्त्रीय प्रक्रीया

(D) बौद्धिक प्रक्रीया

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide

23. Brainstorming is used by the management for ....
   (A) work allocation on the shop floor
   (B) generating alternatives for problem solving
   (C) the promotion of research and development
   (D) training of employees

24. The greatest weakness of the informal organization is ....
   (A) its utter instability
   (B) its behaviour can be predicted
   (C) it does not change
   (D) it is spiritless

25. The management of personnel is also called as ....
   (A) staffing
   (B) controlling
   (C) planning
   (D) co-ordinating

23. व्यवस्थापनाद्वारे विचारमंथनाचे तंत्र .... साठी वापरले जाते.
   (A) निर्माणी स्थळावरील कार्य आवंटन/वाटप
   (B) समस्या सोडविण्यासाठी पर्यायांची निर्मिती
   (C) संशोधन व विकासकार्याचे प्रवर्तन
   (D) कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण

24. अनौपचारिक संघटनेची सर्वात मोठी कमकुवतता म्हणजे :
   (A) ते पूर्णत: अस्थिर असते
   (B) त्याच्या वर्तणूकीचा नेमका अंदाज बांधता येतो
   (C) त्याच्यात परिवर्तन घडवून आणता येत नाही
   (D) ते चैतन्यशून्य असते

25. मानवी संसाधनाच्या व्यवस्थापनास .... ही संज्ञा देखिल प्रचलीत आहे.
   (A) कर्मचारी चयन
   (B) नियंत्रण
   (C) नियोजन
   (D) समन्वय

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide

26. .... operates as a separate autonomous entity and establishes its own mission statement, objectives and marketing plan.

(A) Strategic business unit

(B) Marketing division

(C) Product division

(D) Subsidiary unit

27. The process of evaluation of marketing control mechanism, periodic examination of achievement of objectives and identifying problem area and opportunities is termed as ....

(A) marketing audit

(B) productivity audit

(C) market share analysis

(D) marketing control analysis

26. .... एक स्वायत्त व वेगळी संघटना म्हणून कार्य करते, स्वत:चे जिवित ध्येय, उद्दिष्ट्ये, बाजारपेठ योजना यांची स्वतंत्र आखणी करते.

(A) व्यूहरचनात्मक व्यावसायिक एकक

(B) बाजारपेठ विभाग

(C) उत्पादन विभाग

(D) सहाय्यक एकक

27. बाजारपेठ नियंत्रणाचे तंत्र, उद्दीष्टांच्या प्राप्तीचे कालबद्ध मूल्यमापन आणि समस्या व संधीचे मूल्यमापन करण्याच्या पद्धतीला .... म्हणतात.

(A) बाजारपेठ अंकेक्षण

(B) उत्पादकता अंकेक्षण

(C) बाजारपेठ हिस्सा विश्लेषण

(D) बाजारपेठ नियंत्रण विश्लेषण

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

28. Customer base, customer service, customer satisfaction and customer loyalty development are the pillars of ....

(A) retail management

(B) relationship management

(C) customer development programme

(D) societal concept of marketing

29. The marketing concept, which is based on development, design and implementation of marketing programme that recognises their scope is termed as ....

(A) general marketing

(B) holistic marketing

(C) value based marketing

(D) target marketing

28. ग्राहक आधार, ग्राहक सुविधा, ग्राहक समाधान, ग्राहक निष्ठा विकास हे .... चे आधारस्तंभ आहेत.

(A) किरकोळ व्यवस्थापन

(B) हितसंबंध व्यवस्थापन

(C) ग्राहक विकास कार्यक्रम

(D) बाजारपेठेची सामाजिक संकल्पना

29. बाजारपेठ कार्यक्रमाची व्याप्ती, रचना, विकास व अंमलबजावणी या घटकांची व्याप्ती ओळखून त्या लक्षात घेणाऱ्या संकल्पनेला .... असे म्हणतात.

(A) सामान्य बाजारपेठ

(B) समग्र बाजारपेठ

(C) मूल्याधिष्ठीत बाजारपेठ

(D) लक्षाधिष्ठीत बाजारपेठ

www.prepp.in

30. The marketing process that is carried out through Internet to provide facilities to customers, lower the cost and increase the profit is termed as ....

(A) e-marketing

(B) wireless marketing

(C) cyber marketing

(D) modern marketing

31. .... represents the assets backing for equity shares.

(A) Fair value

(B) Market value

(C) Intrinsic value

(D) Book value

32. A person who subscribes to new issue of share with a view to sell them when the price rises is ....

(A) investor

(B) bear

(C) bull

(D) stag

30. परिव्ययात कपात, लाभात वाढ करण्यासाठी व ग्राहकांना सुविधा पुरविण्यासाठी इंटरनेटचा वापर करून जी विपणन प्रक्रीया वापरली जाते तिला .... म्हणतात.

(A) इ-मार्केटींग

(B) बिनतारी विपणन

(C) सायबर विपणन

(D) आधुनिक विपणन

31. समभागांना .... मालमत्तेचे प्रातिनिधिक पाठबळ असते.

(A) उचित मूल्य

(B) बाजारपेठ मूल्य

(C) अंगभूत मूल्य

(D) पुस्तमूल्य

32. किंमतीत वाढ होईल या आशेने जो नव्याने निर्गमित झालेले समभाग विकत घेतो अशा व्यक्तीला .... असे म्हणतात.

(A) गुंतवणूकदार

(B) मंदीवाला

(C) तेजीवाला

(D) आशावादी गुंतवणूकदार

www.prepp.in

33. .... is the investment analysis wherein the future price of a particular share is studied on the basis of past price movements.

(A) Equity analysis

(B) Market analysis

(C) Technical analysis

(D) Fundamental analysis

34. When a company has the aggregate of the par value of its shares exceeding the true value of its fixed assets, it is termed as ....

(A) capital gearing

(B) trading on equity

(C) overcapitalisation

(D) undercapitalisation

33. .... हे असे गुंतवणूक विश्लेषण आहे की ज्यामध्ये एखाद्या समभागाच्या मागील कामगिरीच्या आधारावर भविष्यकालीन मूल्याचे निर्धारण केले जाते.

(A) सममूल्य विश्लेषण

(B) बाजारपेठ विश्लेषण

(C) तांत्रिक विश्लेषण

(D) मूलभूत विश्लेषण

34. जेव्हा एखाद्या कंपनीच्या स्थिर मालमत्तेच्या प्रत्यक्ष मूल्यापेक्षा तिच्या समभागाचे एकत्रित सममूल्य जास्त असते त्याला .... असे म्हणतात.

(A) भांडवल संतुलन (कॅपिटल गिअरींग)

(B) सममूल्यावर आधारित भांडवलीकरण (ट्रेडिंग ऑन इक्विटी)

(C) अधिभांडवलीकरण

(D) अल्पभांडवलीकरण

www.prepp.in

35. A financial and/or quantitative statement prepared prior to a defined period of time for the purpose of attaining a given objective, is termed as ....

(A) goal

(B) project

(C) programme

(D) budget

36. Moving workers from one job to another is known as ....

(A) Job Enlargement

(B) Change of Role

(C) Job Rotation

(D) Job Appraisal

35. विशिष्ट उद्दीष्ट प्राप्त करण्याच्या हेतूने तयार केलेले वित्तीय आणि संख्यात्मक विवरण म्हणजे .... होय.

(A) ध्येय

(B) प्रकल्प

(C) कार्यक्रम

(D) अंदाजपत्रक

36. एका कार्यापासून दुसऱ्या कार्यावर कामगारांना स्थानांतरित करण्याच्या प्रक्रियेला .... असे म्हणतात.

(A) कार्यविस्तार

(B) भूमिकाबदल

(C) कार्यआवर्तन

(D) कार्य मूल्यांकन

www.prepp.in

37. .... test measures preference reactions of employee to particular occupation/job.

(A) Attitude

(B) Projective

(C) Personality

(D) Interest

38. Ability to apply knowledge in solving a problem is measured in .... test.

(A) intelligent

(B) achievement

(C) aptitute

(D) judgement

39. Transactional analysis is a .... method of training.

(A) experiencial

(B) knowledge based

(C) simulation

(D) on-the-job

37. .... या चाचणीच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांचा विशिष्ट व्यवसाय अथवा कार्याप्रती प्राधान्यक्रमाची प्रतिक्रिया जाणून घेतली जाते.

(A) प्रवृत्ती

(B) भविष्यकाळाचा वेध घेणे

(C) व्यक्तिमत्त्व

(D) रुची

38. एखादी समस्या सोडविण्यासाठी ज्ञानाचा वापर करण्याच्या क्षमतेला .... चाचणी असे म्हणतात.

(A) बुद्धिमत्ता

(B) साध्यता

(C) प्रवृत्ती

(D) निर्णयन

39. व्यवहार विश्लेषण ही .... प्रशिक्षणाची पद्धत आहे.

(A) प्रयोगाधिष्ठीत

(B) ज्ञानाधिष्ठीत

(C) प्रतिकृतीकरण

(D) कार्याधिष्ठीत (प्रत्यक्ष कामावरील प्रशिक्षण)

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

40. Following is *not* the form of workers participation in management (WPM) ....

(A) Joint Management Council

(B) Board Representation

(C) Suggestion Scheme

(D) Informative Participation

41. The banking system which has obviated the need for brick and mortar branch of bank is termed as ....

(A) telebanking

(B) electronic banking

(C) virtual banking

(D) personal banking

42. A bankers lien is always a .... lien.

(A) particular

(B) general

(C) quasi

(D) free

40. .... हा घटक कामगारांच्या व्यवस्थापनातील सहभागाचा भाग होऊ शकणार **नाही**.

(A) संयुक्त व्यवस्थापन परिषद

(B) संचालक मंडळावरील प्रतिनिधित्व

(C) सूचनायोजना

(D) माहितीवर आधारित सहभाग

41. आकारबद्ध अधिकोषणाची गरज ज्या अधिकोषण पद्धतीमध्ये टाळली जाते त्याला .... असे म्हणतात.

(A) दूरभाष अधिकोषण

(B) इलेक्ट्रॉनिक अधिकोषण

(C) आभासी अधिकोषण

(D) व्यक्तिगत अधिकोषण

42. अधिकोषकाचा धारणाधिकार हा नेहमी .... धारणाधिकार असतो.

(A) विशेष

(B) सामान्य

(C) आभासी

(D) मुक्त

www.prepp.in

43. To constitute a person as a customer in a bank there must be ....

(A) some sort of an account

(B) a single transaction of any nature

(C) a dealing of banking nature

(D) frequency of transaction in bank account

44. A document which can be used only for making local payments by a bank is a ....

(A) bankers cheque

(B) cheque

(C) draft

(D) bill of exchange

45. The bank which provides long-term finance is a ....

(A) exchange bank

(B) investment bank

(C) universal bank

(D) lead bank

43. एखादी व्यक्ती अधिकोषाचा ग्राहक होण्यासाठी .... असणे आवश्यक आहे.

(A) कोणत्यातरी स्वरूपातील खाते

(B) कोणत्याही प्रकारचा किमान एक व्यवहार

(C) अधिकोषीय स्वरूपाचे व्यवहार

(D) बँक खात्यामधील व्यवहारांची वारंवारिता

44. केवळ स्थानिक पातळीवर शोधनासाठी (पैसे देण्यासाठी) ज्या पत्राचा बँके द्वारे वापर केला जातो त्याला .... असे म्हणतात.

(A) बँकरचा धनादेश

(B) धनादेश

(C) विकर्ष

(D) हुंडी

45. दीर्घकालीन वित्तपुरवठा करणारा अधिकोष म्हणजे .... होय.

(A) विनिमय अधिकोष

(B) गुंतवणूक अधिकोष

(C) वैश्विक अधिकोष

(D) अग्रणी अधिकोष

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide

46. A currency that is freely convertible into other currencies is a ....

(A) soft currency

(B) hard currency

(C) currency basket

(D) special drawing rights

47. The economic philosophy that equates the possession of Gold or other International monetary assets with wealth is ....

(A) naturalism

(B) environmentalism

(C) materialism

(D) mercantilism

48. When the goods are loaded on the ship the document that is furnished to the Port Superintendent is called as :

(A) bill of lading

(B) bill of sight

(C) mates receipt

(D) goods receipt

46. जी मुद्रा दुसऱ्या कोणत्याही मुद्रेमध्ये मुक्तपणे परीवर्तनीय आहे तिला .... असे म्हणतात.

(A) सहजसाध्य चलन

(B) दुष्प्राप्य चलन

(C) चलनसमूह

(D) विशेष आहरण अधिकार

47. सुवर्ण (स्वर्ण) अथवा इतर आंतरराष्ट्रीय मौद्रिक संपत्तीचा संग्रह म्हणजे संपत्ती संवर्धन आहे, या आर्थिक तत्त्वज्ञानास .... असे म्हणतात.

(A) निसर्गवाद

(B) पर्यावरणवाद

(C) इहवाद

(D) व्यापारवाद

48. जेव्हा जहाजावर वस्तूसाठा चढविला जातो त्यावेळी बंदराच्या पर्यवेक्षकाला जे कागदपत्र दिले जातात त्याला .... असे म्हणतात.

(A) बोटीवरील हुंडी

(B) दर्शनी हुंडी

(C) कप्तानाची पावती

(D) वस्तुची पावती

www.prepp.in

49. The area where a group of countries agree to abolish all trade restrictions and barriers and charge low rates of tariff is ....

(A) customs union

(B) common market

(C) zero tariff zone

(D) free trade area

50. An arrangement to pay for import of goods and services in which something other than cash is paid is called as ....

(A) intertrade

(B) countertrade

(C) zero competition trade

(D) international trade

49. असे क्षेत्र ज्यामध्ये विशिष्ट देशांचा समूह व्यापारावरील निर्बंध आणि अवरोध काढून टाकण्यास तयार असतात आणि कमी दराने प्रशुल्क आकारतात त्यास .... असे म्हणतात.

(A) जकात समूह

(B) सामुदायिक बाजारपेठ

(C) शून्य प्रशुल्क क्षेत्र

(D) मुक्त व्यापार क्षेत्र

50. वस्तु व सेवा आयातीच्या करारात रोख रकमेशिवाय दुसऱ्या पद्धतीने शोधन केले जाते त्याला .... असे म्हणतात.

(A) आंतरव्यापार

(B) प्रतिव्यापार

(C) शून्य स्पर्धा व्यापार

(D) आंतरराष्ट्रीय व्यापार

www.prepp.in

ROUGH WORK

Prepp Your Personal Exam Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

ROUGH WORK

Prepp Your Personal Exam Guide

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet No. **F**

प्रश्नपत्रिका क्र.

Signature of Invigilators

1. ....

2. ....

Seat No. [ ] [ ] [ ] [ ] [ ] [ ]

(In figures as in Admit Card)

Seat No. (In words) ....

....

COMMERCE
Paper II

NOV - 50211

Answer Sheet No. [ ] [ ] [ ] [ ] [ ]

Time Allowed : 75 Minutes] **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **24**

Instructions for the Candidates

1. Write your Seat Number in the space provided on the top of this page. Write your Answer Sheet No. in the space provided for Answer Sheet No. on the top of this page.
2. Write and darken Test Booklet No. on OMR Answer Sheet.
3. This paper consists of **Fifty (50)** multiple choice type of questions.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the responses as indicated below on the correct response against each item.
   Example : (A) (B) ● (D)
   Where (C) is the correct response.
5. Your responses to the items for this paper are to be indicated on the Answer Sheet only. Responses like (×) (▯) (/) and **light shaded responses will not be considered/evaluated.**
6. Read instructions given inside carefully.
7. One Sheet is attached at the end of the booklet for rough work.
8. You should return the test booklet and answer sheet **both** to the invigilator at the end of the paper and should not carry any paper with you outside the examination hall.
9. Answers marked on the body of the question paper will not be evaluated.

परीक्षार्थींसाठी सूचना

1. या पानावरील वरच्या कोपऱ्यात आपला आसन क्रमांक तसेच आपणास दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. प्रश्नपत्रिका क्रमांक OMR उत्तरपत्रिकेवर दिलेल्या रकान्यात लिहून त्याप्रमाणे काळा करावा.
3. या प्रश्नपत्रिकेत **पन्नास** बहुनिवड प्रश्न आहेत.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा करावा.
   उदा. (A) (B) ● (D)
   जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेमध्येच द्यावीत. उत्तराच्या रकान्यामध्ये (×) (▯) (/) व **अस्पष्टपणे काळे केलेले उत्तर ग्राह्य धरले जाणार नाही.**
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. कच्च्या कामासाठी प्रश्नपत्रिकेच्या शेवटी कोरे पान जोडले आहे.
8. या पेपरची परीक्षा संपल्यानंतर प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका **दोन्ही** पर्यवेक्षकांना परत करावी. यातील कोणताही कागद तुमच्या बरोबर परीक्षा केंद्राबाहेर नेण्यास सक्त मनाई आहे.
9. प्रश्नपत्रिकेवर दर्शविलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.